# जिल्हा परिषद रत्नागिरी.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन
माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष

दुरध्वनी क्र. ०२३५२-२२०३४१ ई-मेल :- jjmdwsm@gmail.com

जा.क्र.रजिप/पावस्व/आस्थसा /JJM/भाडे. वाहन दरपत्रक सुचना/१५८३/२०२४, दि. १०/१२/२०२४

## - स्वारस्य अभिरूची प्रस्ताव -

**विषय :- जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता विभागासाठी १ वाहन भाडेतत्वावर ११ महिन्यासाठी उपलब्ध करून देणेसाठी दरपत्रके मागविणेबाबत..**

**संदर्भ :- मा.मु.का.अ., जि.प.रत्नागिरी यांची मंजूर टिपणी दि.१० /१२ /२०२४**

नुसार जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावर जिल्हा पाणी व स्वच्छता विभागासाठी १ वाहन भाडेतत्वावर ११ महिन्यासाठी घ्यावयाचे असल्याने खालील तपशिला प्रमाणे सेवापुरठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर स्पर्धेकरीता खालील तपशिला प्रमाणे सेवापुरठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**तक्ता क्र.१**

| अ. क्र. | वाहन वापरणारा विभाग | तपशिल | वाहनाचा प्रकार | आवश्यक वाहनांची संख्या | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प.रत्नागिरी | जल जीवन मिशन अंतर्गत क्षेत्रीय कामाकरीता<br>१) GST सह प्रती महिना र. रु. ५०,०००/- मर्यादेपर्यंत<br>२) दरमहा किमान ३००० कि.मी. | ७ ते १० आसन क्षमता असलेले वाहन | ०१ | |
| | | | | **एकूण -** | |

वरील नमुद केल्याप्रमाणे दिनांक २३ / १२ /२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सिलबंद दरपत्रकांचे लखोटे या कार्यालयाकडे सादर करणेत यावेत. प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २४/१२ /२०२४ रोजी दुपारी ४.०० वा. या कार्यालयात उघडली जातील. सदर दरपत्रके उघडताना आपण स्वत: किंवा आपला प्रतिनिधी उपस्थित राहील असे पहावे. मुदतीनंतर प्राप्त स्वारस्य अभिरुची प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. प्राप्त प्रस्तावांपैकी कोणत्याही प्रस्ताव अथवा सर्व प्रस्ताव नाकारण्याचा अथवा सदर प्रक्रिया कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवले आहेत.

**अटी व शर्ती :-**

१) दरपत्रक, हे वर नमुद केलेल्या वेळेनुसारच जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प.रत्नागिरी येथे सादर करावे.

२) पुरवठादाराकडून मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा स्विकार केला जाणार नाही.

३) वाहनासाठी केलेला करार कोणतेही कारण न देता केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांचेकडे राखून ठेवला आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमाकरिता भाडेतत्त्वावर १ वाहने आवश्यक आहेत. सदर एका वाहनाची प्रतीमहा धावसंख्या ३००० कि.मी. निश्चित करण्यात आलेली आहे. सदर वाहनाची प्रतिमहा धावसंख्या ३००० कि.मी.पेक्षा कमी फिरल्यास दिलेल्या अटी व शर्तीनुसार सेवापुरवठादाराला ३००० कि.मी.प्रमाणे होणारी रक्कम निविदेतील मंजूर दराने अदा करण्यात येईल. तसेच ३००० कि.मी.पेक्षा वाहन जास्त फिरल्यास जादा झालेल्या धावसंख्येचे देयक अदा करता येणार नाही. तरी सदरची धावसंख्या ३००० कि.मी.पेक्षा जास्त होणार नाही याची जबाबदारी संबंधित मंजूर सेवापुरवठादाराची राहील.

४) इंधन, वंगण, वाहन चालकाचा खर्च (वेतन भत्ते इत्यादी) वाहन चालकास सेवापुरवठारांनी द्यावयाचा आहे.

५) वाहनाचा वापर ग्रामीण भाग, डोंगराळ व अतिदुर्गम भागात केला जाईल.

६) वाहन २४ तास कार्यालयासाठी उपलब्ध असेल. त्यासाठी कुठलाही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.

७) वाहन भाडेतत्त्वावर घेऊन सदरची वाहन ८ ते १० आसनक्षमतेचे असावे. वाहन सदैव सुस्थितीत असावे.

८) **पुरवठाराने वाहनांचे सर्व कागदपत्रे अद्ययावत असावी. पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन विमा, आय.टी. रिटर्न, नोंदणी पुस्तक(RC Book),PUC, तसेच सोबत देण्यात आलेले हमीपत्र व प्रतिज्ञापत्र इत्यादी दरपत्रकातील लिफाप्यामध्ये सादर करावेत.** निविदाकार एका वाहनाकरीता दरपत्रक सादर करु शकतो. ज्या वाहनाची कागदपत्र दरपत्रक प्रक्रियेवेळी सादर केली असतील तेच वाहन देणे बंधनकारक आहे. दरपत्रक लिफाप्यामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रतआवश्यकतेनुरुप पूरवठादाराला पुरवाव्या लागतील.

९) वाहन पुरवठादाराचे स्वत:च्या मालकीचे असणे आवश्यक आहे. वाहनाबाबतची व वाहकाची कोणतीही नुकसान भरपाईसाठी स्वत: वाहनपुरवठादार / मालक जबाबदार राहिल.

१०) किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे ही वाहन मालकाची जबाबदारी राहील.

११) किरकोळ स्वरुपाची दुरुती ०१ दिवसात, तर मोठया स्वरुपाची दुरुस्ती जास्तीत जास्त ०३ दिवसात करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची / पुरवठाधारकाचीराहील.

१२) वाहन दुरुस्तीसाठी होणारी धाव कार्यालयीन कामकाजाच्या धावेत समाविष्ट असणार नाही.

११) पिरिऑडिकल मेंटेनन्ससाठी(Periodical Maintenance)लागणारे फिल्टरर्स, वंगण व मजुरी वाहनाच्या दुरुस्ती व देखभाल यात समाविष्ट राहील.वाहनाचे टायर हे Remolding केलेले नसावे. तसे आढळल्यास वाहनाचा करार तात्काळ रद्द करण्यात येईल.

१३) वाहनांची नोंदणी प्रादेशिक परिवहन प्राधिकरण रत्नागिरी यांचेकडे ०१ जानेवारी, २०२० नंतर झालेली असावी.

१४) वाहनाबाबतची कोणतीही नुकसान भरपाईसाठी स्वत: वाहन पुरवठादार / मालक जबाबदार राहिल.

१५) पुरवठादाराच्या वाहनाचे कागदपत्र दरपत्र लिफाप्यामध्ये सादर केलेले असतील, ते वाहन निविदा कालावधीमध्ये अन्य शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्था यांचेकडे भाडेकरारावर देण्यात आले नसलेबाबतचे हमीपत्र दरपत्रक लिफाप्यामध्ये सादर करावेत.

१६) पुरवठादाराने आपल्या वाहनाचे भाडयाचे दर GST सह आकडयात व अक्षरात अशा दोन्ही स्वरुपात स्पष्ट करावेत. दोन्ही मध्ये फरक आढळल्यास अक्षरी दरअवैध ठरविला जाईल.

१७) **दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्यास तसा र.रुपये ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करणे बंधनकारक राहिल. दरपत्रक तयार करताना झालेली खाडाखोड साक्षांकीत करुन पूर्ण स्वाक्षरीनिशी पुरवठादाने सादर करावी.**

१८) वाहनचालकाचेओळखपत्र वाहन पुरवठादाराने तयार करुन घ्यावे. वाहनचालकाचा वाहन चालविणेच्या परवान्याची साक्षांकीत सत्यप्रत कार्यालयात सादर करावी.

१९) पुरवठादाराकाकडे या कार्यालयाने मागणी केल्यास आयकर सर्टिफिकेटस सादर करणे आवश्यक आहे. अस्तित्वात असलेल्या शासकीय नियम व कायद्यानुसार आयकर कपात केली जाईल.

२०) वाहन पुरवठादारास वाहन भाडयाव्यतिरिक्त कोणतीही इतर रक्कम देय असणार नाही. वाहन वेळेवर उपलब्ध न केल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल.

२१) वाहनासाठी लागणारी डयुटी स्लीप वाहन पुरवठादाराने पुरविण्याची असून वाहनाचा वापर करणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेणेची तसेच लॉग बुक पूर्ण करण्याची जबाबदारी वाहन पुरवठादाराची असेल. सूचनांचे पालन न केल्यास करार रद्द केला जाईल.

२२) पुरवठादाराच्या कालावधीत वाहनाची कामे, डिझेल दर वाढ इत्यादी मुळे भाडेदरात वाढ केली जाणार नाही.

२३) वाहन पुरवठादाराने कक्षाकडे वाहन देताना त्यावर कोणत्याही प्रकारचा स्टिकर लावू नये.

२४) वाहनाच्या कराराच्या काळात पाणी व स्वच्छता विभाग,जिल्हा परिषद रत्नागिरी यांचेमार्फत तयार करण्यात आलेला लोगो मोठया आकाराने गाडीवर चिटकविणेत येतील. तसेच पाणी व स्वच्छतेचे चित्रमय संदेश वाचनिय पध्दतीने चिटकविण्यात येतील.

२५) कराराच्या कालावधीत वाहन खराब नादुरुस्त झाल्यास वाहन मालकाने ताबडतोब त्याच प्रकारचे वाहन उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. त्यासाठी कोणतेही अतिरीक्त शुल्क देता येणार नाही.

२६) वाहनचालकाने वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याच्या सुचनांचे पालन न केल्यास, गैरवर्तणूक करताना आढळल्यास तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. वापरात नसताना वाहन चालकांच्या जबाबदारीवर वाहन कार्यालयाच्या आवारात ठेवणे आवश्यकआहे.

२७) वाहनमालकांनी वाहनाचा परस्पर वापर केल्याचे निदर्शनास आल्यास झालेले कि.मी. पोटीचे भाडे वजा करुनआर्थिक दंड केला जाईल

२८) पुरवठादारला रस्ता/रस्त्यावरील पुलाच्या वापराबाबत चा टोल स्वत: भरावा लागेल, त्यासाठी अतिरिक्त देयकांची मागणी करता येणार नाही

२९) सुरवाती चे किलोमीटरची धावसंख्या वाहन धारकाला करारपत्रात नोंद करावी.

३०) दरपत्रकातील अटी व शर्ती बंधनकारक राहतील तसेच कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेचे सर्व अधिकारखाली सही करणार यांनी राखुन ठेवले आहेत

३१) दरपत्रक उघडले नंतर वाहनाचे कि.मी. दर वाजवीपेक्षा जास्तअसल्याचे निदर्शनास आल्यास वाटाघाटीने दर निश्चित करण्यासाठी सर्व पात्र धारकांना बोलविण्यात येईल व वाटाघाटीने दर निश्चित करण्यात येतील किंवा दरपत्रक प्रक्रिया रद्द करुन नव्याने दरपत्रक मागविण्यात येतील. याबाबतचा अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी याचा राहिल. तो सर्वांवर बंधनकारक राहील.

३२) भाडेतत्वावर घेण्यात येणाऱ्या वाहनांची आसन क्षमता ७ ते १० ची असावी.

३३) कंत्राटीपध्दतीने भाडेतत्वावर घेण्यात येणाऱ्या वाहनाचा करार ११ महिने राहिल, तसेच एकूण रक्कमेच्या ३% सुरक्षा अनामत रक्कमेचा धनाकर्ष मा. प्रकल्पं संचालक(पा. व स्व), जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या नावे जमा करण्यात यावा. तसेच शासनाकडुन अनुदान उपलब्ध झाल्यानंतर पुरवठा आदेश देण्यात येईल.

३४) जल जीवन मिशन या योजनेचा कालावधी सन २०२५ नंतर वाढवून देणेबाबतच्या सुचना प्राप्त झाल्यानंतर पुढील कालावधीसाठी वाहन पुरवठा करणेबाबतचा आदेश दयावयाचा अगर कसे याबाबतचा निर्णय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प रत्नागिरी यांचेकडे राखून ठेवला आहे.

**-जाहिरातीचा प्रारुप –**

| |
|---|
| **महाराष्ट्र शासन**<br>**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प.रत्नागिरी**<br>जलजीवन मिशन अंर्तगत भाडेतत्वावर वाहनाकरीता पुरवठादार यांचे कडून विहीत नमुन्यात सुची तयार करण्यासाठी आवेदन. |
| जलजीवन मिशन अंर्तगत ११ महिन्या करीता रत्नागिरी जिल्हयासाठी भाडेतत्वावर १ वाहन पुरवठादाराकडुन बंद लखोटयामध्ये मागविणेत येत आहे. याबाबतचे कामाचे प्रारुप, अटी व शर्ती https://www.zpratnagiri.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. |
| अध्यक्ष,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी- ४१५६१२<br>दूरध्वनी क्र. ०२३५२-२२०३४१ Email – jjmdwsm@gmail.com |
| अर्ज स्विकारण्याची शेवटीची तारीख दि.२७ /१२ /२०२४ रोजी सांयकाळी ३.०० पर्यंत |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.